# अधिसूचना

क्रमांक : १३३/२०१७

दिनांक : १४-०९-२०१७

**विषय :- नविन महाविद्यालयाचे प्रथम संलग्निकरणाबाबत..**

सर्व संबंधीतांचे माहीतीकरीता अधिसूचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने खाली दर्शविलेले नविन महाविद्यालये सुरु करण्यास AICTE व शासन निर्णयात नमुद केलेल्या अटींच्या अधिन राहुन कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेली आहे. त्याअनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समितीत्यांचे अहवाल विद्वत परिषदेच्या पक्षात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम १२(७) अंतर्गत स्विकृत केल्यानुसार, स्तंभ क्र.२ मध्ये दर्शविलेल्या संस्थेच्या स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या नविन महाविद्यालयास स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या अभ्यासक्रमाकरीता स्तंभ क्र. ६ मध्ये दर्शविलेल्या कालावधीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम १०८ व ११० मध्ये दर्शविलेल्या तरतुदींचे अधिन राहुन प्रथम संलग्निकरण प्रदान करण्यात येत आहे.

महाविद्यालयात उपरोक्त अभ्यासक्रमास प्रवेश देतांना शासनाने व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने निर्धारित केलेल्या नियमांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक आहे. मान्य प्रवेशक्षमतेपेक्षा अतिरीक्त विद्यार्थांना प्रवेश देण्यात येऊ नये.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे नियम, विनियम, अध्यादेश, परिनियम, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतुदी महाविद्यालयास बंधनकारक राहतील.

नियमानुसार शिक्षकांची तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदे भरणे संस्थेला बंधनकारक आहे.

शासन निर्णय क्र. युजीसी २००३/(३३/०३)/१ विशी-४, दिनांक ०६ एप्रील, २००३ प्रमाणे संस्थेच्या शैक्षणिक शुल्काच्या सुत्रांचे नियमन करणे व शैक्षणिक संस्था विनियम प्राधिकारीणीकडून सर्व अभ्यासक्रमांच्या शुल्काचे प्रमाणिकरण करुन घेणे संस्थेस / महाविद्यालयास बंधनकारक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारण्यापूर्वी शैक्षणिक शुल्काच्या सुत्रांचे प्रमाणिकरण शैक्षणिक संस्था विनियम प्राधिकारीणीकडून मान्य करुन घ्यावे व त्यानुसारच शुल्काची आकारणी करावी.

तसेच शासन निर्णयातील अटी व शर्तीचे, संस्थेने/महाविद्यालयाने पालन करावे तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ चे कलम १०८ नुसार त्वरीत हमीपत्र सादर करणे संस्थेवर बंधनकारक आहे.

## तक्ता

| अ. क्र. | संस्थेचे नांव व पत्ता | महाविद्यालयाचे नांव व ठिकाण | विद्याशाखा अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | संलग्निकरणाचा कालावधी | शासन निर्णय क्र., व दि. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| १. | व्हीजन बुलडाणा एज्युकेशन अॅन्ड वेलफेअर सोसायटी, बुलडाणा. | लध्द्ड कॉलेज ऑफ फार्मसी, येलगांव, चिखली रोड, बुलडाणा. | बी.फार्म. | ५० | सत्र २०१७-१८ | क्र.टीईएम-२०१७/ प्र.क्र.२२४/तांशि-४, दि. १६/०५/२०१७ |
| २. | नेहरू युवा क्रीडा व सांस्कृतिक मंडल, सरस्वती नगर, चिखली, बुलडाणा. | गावंडे कॉलेज ऑफ फार्मसी, लव्हाळा रोड, साखरखेर्डा, ता.सिंधखेडराजा, जि.-बुलडाणा | बी.फार्म. | १०० | सत्र २०१७-१८ | क्र.टीईएम-२०१७/ प्र.क्र.२१४/तांशि-४, दि. १५/०५/२०१७ |
| ३ | पी.आर.पोटे पाटील एज्युकेशन अॅन्ड वेलफेअर ट्रस्ट, कॅम्प, अमरावती. | पी.आर.पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, कठोरा रोड, अमरावती. | बी.फार्म. | १०० | सत्र २०१७-१८ | क्र.टीईएम-२०१७/प्र.क्र. २२७/तांशि-४, दि. २३/०५/२०१७ |
| ४ | इंदिरा बहुउद्देशिय शिक्षण संस्था, चिखली रोड, बुलडाणा. | डॉ.राजेंद्र गोडे इंन्स्टिट्युट ऑफ फार्मसी, विद्यापीठ मार्डी रोड, अमरावती. | बी.फार्म. | ५० | सत्र २०१७-१८ | क्र.टीईएम-२०१७/ प्र.क्र.२२४/तांशि-४, दि. १६/०५/२०१७ |

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****